REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 14 | ISSUE - 10 | JULY - 2025

# "छत्रपती संभाजीनगर शहरातील माध्यमिक शाळेतील शिक्षकांची स्व-संकल्पना व शिक्षक समायोजन यांच्या सहसंबंधाचा अभ्यास"

डॉ. शेख सुभान हसन
सहायक प्राध्यापक ,
मराठवाडा कॉलेज ऑफ एज्युकेशन, छत्रपती संभाजीनगर.

## ❖ प्रस्तावना :-



शिक्षक हा समाजाचा अविभाज्य घटक आहे तो देशाची भावी पिढी घडविण्याचे कार्य करतो एक शिक्षक देशासाठी उत्कृष्ट डॉक्टर, अभियंता, शास्त्रज्ञ आणि वैज्ञानिक घडवू शकतो तसेच जर शिक्षक आपले कर्तव्य व जबाबदाऱ्या या बाबतीत जागरूक नसेल तर तो देशाची भावी पिढी बरबाद हि करू शकतो त्यामुळे शिक्षक याची स्वतः विषयीची संकल्पना कशी आहे तो शाळेत वावरत असताना विद्यार्थ्यांशी, शालेय वातावरणाशी व स्वतःच्या गरजांशी म्हणजेच प्रत्येक विद्यार्थ्याची शिकण्याची पद्धत, क्षमता आणि गरजा वेगळया असतात. शिक्षकांनी या सर्वांशी जुळवून घेऊन, विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करणे आवश्यक आहे तसेच शाळेतील नियम, अभ्यासक्रम आणि इतर शिक्षकांशी जुळवून घेणे, शाळेत सकारात्मक वातावरण तयार करणे, स्वतःच्या कामाच्या ताणतणावावर नियंत्रण ठेवणे, आणि मानसिक तसेच शारीरिकदृष्ट्या सक्षम असणे खूप गरजेचे आहे कारण या सर्व बाबींचा थेट परिणाम विद्यार्थ्यांवर होतो म्हणून या बाबी जाणून घेणे महत्वाचे ठरते यासाठीच संबंधित समस्येची निवड करण्यात आली आहे.

## ❖ उद्दिष्ट्ये :-

1. माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या स्व-संकल्पनेचा अभ्यास करणे.
2. माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या शिक्षक समायोजनाचा अभ्यास करणे.
3. माध्यमिक शाळेतील शिक्षकांची स्व-संकल्पना व शिक्षक समायोजन यांच्यातील सहसंबंधांचाअभ्यास करणे.

## ❖ परिकल्पना :-

1. माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या स्व-संकल्पनेचा स्तर सकारात्मक आहे.
2. माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या शिक्षक समायोजनाचा स्तर उच्च आहे.
3. माध्यमिक शाळेतील शिक्षकांची स्व-संकल्पना व शिक्षक समायोजन यांच्यात घनिष्ठ सहसंबंधआहे.

## ❖ संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा :-

1. प्रस्तुत संशोधन हे छत्रपती संभाजीनगर शहरापुरते मर्यादित आहे.

2. प्रस्तुत संशोधन हे केवळ माध्यमिक शाळेतील शिक्षकाकांशी संबंधित आहे.
3. प्रस्तुत संशोधन हे माध्यमिक शाळेतील शिक्षकाकांची स्व-संकल्पना व शिक्षक समायोजन यांच्याशी संबंधितआहे.

## ❖ संशोधनाची पद्धत :-

सदरील संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

## ❖ जनसंख्या :-

छत्रपती संभाजीनरातील सर्व माध्यमिक शाळांतील शिक्षक हि सदरील संशोधनाची जसंख्या आहे.

## ❖ नमुना :-

संबंधित संशोधनासाठी छत्रपती संभाजीनरातील १० माध्यमिक शाळांतील प्रत्येकी ५ अश्या एकूण ५० शिक्षकांची निवड सुगम यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने करण्यात आली.

## ❖ माहिती संकलनाचे साधन -

संबंधित संशोधनासाठी शिक्षकांच्या स्व-संकल्पनेचा अभ्यास करण्यासाठी डॉ. के.जी अग्रवाल यांची प्रमाणित चाचणी वापरण्यात आली आहे तर शिक्षकांच्या शिक्षक समायोजनाच्या अभ्यासासाठी एस. के. मंगल याची प्रमाणित शिक्षक समायोजन चाचणी वापरण्यात आली आहे

## ❖ प्राप्त माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन –

**सारणी क्रमांक :- 01**

**शिक्षकांच्या स्वसंकल्पनेचा स्तर दर्शवणारी सारणी**

| प्राप्तांकाचा विस्तार | शिक्षकांच्या स्व-संकल्पनेचा स्तर |
|---|---|
| - 45 to - 27 | उच्च नकारात्मक |
| - 26 to - 9 | नकारात्मक |
| - 8 to + 9 | तटस्थ |
| + 10 to + 27 | सकारात्मक |
| + 28 to + 45 | उच्च सकारात्मक |

**सारणी क्रमांक :- 02**

**शिक्षकांच्या शिक्षक समायोजनाचा स्तर दर्शवणारी सारणी**

| प्राप्तांकाचा विस्तार | शिक्षकांच्या समायोजनाचा स्तर |
|---|---|
| 555 & above | खूप चांगला |
| 463 – 554 | चांगला |
| 369 – 462 | साधारण |
| 277 – 368 | अल्प |
| 276 & below | अत्यल्प |

**सारणी क्रमांक :- 03**

**शिक्षकांची स्व-संकल्पना व शिक्षक समायोजन यांचे मध्यमान आणि प्रमाण विचलन दर्शवणारी सारणी**

| चल | शिक्षकांची संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन |
|---|---|---|---|
| स्व-संकल्पना | 50 | -13.9 | 10.05 |
| शिक्षक समायोजन | 50 | 310.6 | 49.7 |

**सारणी क्रमांक :- 04**

**शिक्षकांची स्व-संकल्पना व शिक्षक समायोजन यांचे सहसंबंध दर्शवणारी सारणी**

| चल | शिक्षकांची संख्या | सहसंबंध गुणक |
|---|---|---|
| स्व-संकल्पना | 50 | - 0.10 |
| शिक्षक समायोजन | 50 | |

## ❖ परिकल्पना पडताळणी :-

### 1. माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या स्व-संकल्पनेचा स्तर सकारात्मक आहे.

माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या स्व-संकल्पनेचा अभ्यास केला असता या शिक्षकांच्या स्व-संकल्पनेचे मध्यमान सारणी क्रमांक ०३ नुसार -१३.०९ आले ज्याचा स्तर सारणी क्रमांक ०३ नुसार नकारात्मक आहे त्यामुळे संबंधितपरिकल्पनेचा त्याग करावा लागेल व हे मान्य करावे लागेल कि, माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या स्व-संकल्पनेचा स्तर नकारात्मक आहे.

### 2. माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या शिक्षक समायोजनाचा स्तर उच्च आहे.

माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या शिक्षक समायोजनाचा अभ्यास केला असता या शिक्षकांच्या शिक्षक समायोजनेचे मध्यमान सारणी क्रमांक ०३ नुसार ३१०.६ आले आहे ज्याचा स्तर सारणी क्रमांक ०३ नुसार अल्प आहे त्यामुळे संबंधित परिकल्पनेचा त्याग करावा लागेल व हे मान्य करावे लागेल कि, माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या शिक्षक समायोजनाचा स्तर अल्प आहे.

### 3. माध्यमिक शाळेतील शिक्षकांची स्व-संकल्पना व शिक्षक समायोजन यांच्यात घनिष्ठ सहसंबंध आहे.

माध्यमिक शाळेतील शिक्षकांची स्व-संकल्पना व शिक्षक समायोजन यांच्या सहसंबंधाचा अभ्यास केला असता सारणी क्रमांक ०४ नुसार शिक्षकांची स्व-संकल्पना व शिक्षक समायोजन यांच्या सहसंबंधाचा सहसंबंध गुणक -०.१० आले आहे त्यामुळे संबंधित परिकल्पनेचा त्याग करावा लागेल व हे मान्य करावे लागेल कि, माध्यमिक शाळेतील शिक्षकांची स्व-संकल्पना व शिक्षक समायोजन यांच्यात ऋण / नकारात्मक सहसंबंध आहे.

## ❖ मुख्य निष्कर्ष :-

1. माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या स्व-संकल्पनेचा स्तर नकारात्मक आहे.
2. माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या शिक्षक समायोजनाचा स्तर अल्प आहे.
3. माध्यमिक शाळेतील शिक्षकांची स्व-संकल्पना व शिक्षक समायोजन यांच्यात ऋण / नकारात्मक सहसंबंधआहे.

## ❖ संदर्भग्रंथ:-


1. https://www.aiirjournal.com/uploads/Articles/2019/07/3907_37.surandra%20Herkal.pdf
2. https://en.wikipedia.org/wiki/Self-esteem
3. https://www.augusta.edu/online/blog/teacher-self-assessment/

4. https://www.mightynetworks.com/resources/self-learning
5. http://www.edugyan.in/2017/03/adjustment-maladjustment.html#google_vignette
6. https://www.utkarsheducation.com/2022/06/adjustment-and-maladjustment.html
7. पंडित,बन्सी बिहारी (१९८७), शिक्षणातील संशोधन संख्यात्मक व गुणात्मक, पुणे : नुतन प्रकाशन.
8. मुळे.रा.श. आणि उमाटे, वि.मु. (१९७७), शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, नागपूर : साहित्य प्रचार केंद्र सीताबर्डी.
9. कदम.चा.प. (१९९९), शैक्षणिक संख्याशास्त्र (दुसरी आवृत्ती ) पुणे : नुतन प्रकाशन.
10. आगलावे, प्रदीप (२०००), संशोधन पद्धतिशास्त्र व तंत्र नागपूर : विद्या प्रकाशन.
11. भिंताडे,वि.रा. (२००५), शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणे : नुतन प्रकाशन.
12. शेटकर,ग.वि. व जोशी, शोभना (२००६), शैक्षणिक मूल्यमापन व कृती संशोधन, औरंगाबाद : मृण्मयी प्रकाशन.
13. घोरमोडे,के.यु. आणि घोरमोडे,कला (२००६ ), शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, (प्रथम आवृत्ती ), नागपूर : विद्या प्रकाशन.
14. बरवे, मीनाक्षी आणि कुंडले, सुरेखा ( २००८ ), शैक्षणिक मूल्यमापन संख्याशास्त्र व कृती संशोधन, पुणे : नित्यनुतन प्रकाशन..
15. भांडारकर,के.एम. ( २०१० ), सुलभ शैक्षणिक संख्याशास्त्र, पुणे : नित्यनुतन प्रकाशन.